



दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार ६ नोव्हेंबर २०२४ | अंक ३३१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

# जळगावात गाडीत गॅस भरत असताना स्फोट, बुलेट दुचाकी चक्क आकाशात फुटबॉलसारखी उडाली



## अग्निशामक दलाच्या मदतीने आग आटोक्यात

घटनेची माहिती मिळाल्यावर महापालिकेच्या अग्निशमन दलामे घटनास्थळ गाठत आग आटोक्यात आणली. मात्र तोपर्यंत संपूर्ण ओमनी दूचाकी तसेच दुकान पूर्णपणे जळून खाक झाले होते. या स्फोटामध्ये एक बुलेट दुचाकी चक्क आकाशात फुटबॉल सारखी उडाल्याची माहिती सुद्धा प्रत्यक्षदर्शनी दिली आहे. घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. संबंधित परिसरात एमआयडीसी पोलिसांच्या आशीर्वादाने अवैध पद्धतीने वाहनात गॅस भरण्याचा उद्योग सुरू असल्याची माहिती मिळाली असून, या घटनेनंतर नागरिकांकडून संबंधितांवर कारवाईची मागणी केली जात आहे.

## नेमकं काय घडलं?

जळगावात गॅस भरत असताना सिलेंडरचा स्फोट झाल्याने ओमिनी गाडी जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत गॅस भरणारे 3 जण आणि एक गाडी मालक असे चार जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी बेकायदेशीररित्या तसेच अवैध पद्धतीने वाहनात गॅस भरला जात होता, त्यातून ही गंभीर घटना घडली आहे. सिलेंडरचा स्फोट झाल्यानंतर ओमनी गाडीने पेट घेतला. त्यानंतर भीषण आग लागली. या घटनेत गॅस भरणाऱ्याचे दुकान तसेच एक दुचाकी पूर्णपणे जळून खाक झाली आहे. या दुर्घटनेत भाजलेल्या गंभीर चारही जणांना रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहेत.

जळगावात ओमनी गाडीत गॅस भरत असताना सिलेंडरचा स्फोट झाला. या स्फोटामुळे ओमनी गाडीला आग लागली. तसेच अवैधपण गॅस भरणाऱ्या दुकानालादेखील आग लागली. या आगीत ओमनी गाडी आणि दुकान जळून खाक झालं आहे. तसेच चार जण जखमी झाल्याची माहिती आहे. अनेकजण अवैधरित्या गॅस भरतीचा उद्योग करतात. पण शक्यतो तशा चुका टाळायला हव्यात. कारण त्यामुळे मोठ्या अपघाताच्या घटनेला सामोरं जाण्याची नामुष्की ओढावली जाऊ शकते. जळगावात अशीच काहीशी घटना घडली आहे. बेकायदेशीररित्या वाहनात गॅस भरती केल्याने जळगावात ओमनी गाडीला आग लागली आणि मोठा स्फोट झाला. या स्फोटात संबंधित दुकान जळून खाक झालं आहे. तसेच बुलेट दुचाकी चक्क आकाशात फुटबॉलसारखी उडाली. या घटनेत 4 जण जखमी झाले आहेत. तसेच या घटनेमुळे जळगावात एकच खळबळ उडाली आहे.

## पक्षादेश व धर्मगुरूंचा आदेश माझ्यासाठी अंतिम म्हणून निवडणुकीतून माघार - ॲड. शेख शफीक भाऊ

बीड (प्रतिनिधी) - सेक्युलर मतांचे ध्रुवीकरण होऊ नये, जातीयवादी शक्तींना बळ मिळू नये. याकरिता पक्षाने दिलेले आदेश व धर्मगुरूंचे आदेश माझ्यासाठी अंतिम म्हणून निवडणुकीतून माघार घेतल्याचे एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, समाजातील नेतृत्वामध्ये एक मत झाले नाही. तसेच पक्ष उमेदवारीसाठी अनुकूल नव्हता. तरीसुद्धा जनतेच्या दबावामुळे व विनंतीस मान देऊन अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. मात्र शेवटच्या क्षणापर्यंत सुद्धा एकमत होत नसल्याने उमेदवारी अर्ज मागे घेतला. कारण पक्ष महाराष्ट्रात जास्त जागा लढवून जातीय शक्तींना लाभ होऊ देण्याच्या विचारात नाही. जिथे जातीय शक्ती असलेल्या पक्षांचे उमेदवार आरामात निवडून येऊ शकतील अशा जागी आपल्याकडून कोणतीही चूक करण्यास पक्ष तयार नाही. जेणेकरून आपल्याकडून जातीय शक्तींना बळ मिळू नये. जिथे जातीय शक्तींचे उमेदवार पाडून आपण आपल्या पक्षाचे उमेदवार निवडून आणू शकतो अशाच ठिकाणी पक्षाने उमेदवार दिले आहे. जातीयवादी शक्तींना रोखण्यासाठी सेक्युलर



विचारसरणी असलेल्या लोकांनी एकत्र येऊन आपला उमेदवार ठरविणे आवश्यक होते परंतु शेवटच्या क्षणापर्यंत सुद्धा यावर एकमत होऊ शकले नाही. आपण आपल्या परीने एकाच उमेदवारीसाठी खूप प्रयत्न केले परंतु अंतिम निर्णय होऊ शकला नाही. सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले. यामुळे निवडणुकीत जातीयवादी शक्तींना आपल्या उमेदवारीमुळे लाभ होऊ नये म्हणून पक्षाने दिलेला आदेश तसेच धर्मगुरूंनी दिलेले आदेश तसेच ऑल इंडिया उलेमा बोर्ड तर्फे आलेला पत्र यामुळे आपण शिरसावंद्य मानून बीड विधानसभा मतदारसंघातून भरलेला अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. असे मत एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

## निवडणुक निरीक्षकांची नेकनुर हद्दीतील रत्नागिरी फाटा,चौसाळा तपासणी नाक्याला भेट

बीडः- ( दि.०५ ) विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुकी दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येत असुन तपासणी नाक्यावर वाहनांची कसुन तपासणी आणि चौकशी करण्यात येत आहे. निवडणुक निरीक्षक एस.मल्लिका यांनी काल दि.४ सोमवार रोजी केज मतदार संघातील नेकनुर पोलिस स्टेशन हद्दीतील नेकनुर, रत्नागिरी फाटा,चौसाळा तपासणी नाक्याला भेट देऊन पाहणी केली. कर्तव्यावर असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याबाबत आवश्यक सुचना दिल्या.यावेळी केज उपविभागीय पोलिस अधिकारी कमलेश मीना, नेकनुर पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी उपस्थित होते.एसएसटी पथका मार्फत दिवसा व रात्री वाहनांची तपासणी करण्यात करण्यात येत आहे.



# बीड विधानसभा मतदारसंघ विकासाच्या वाटेवर आणण्यासाठी संधी द्यावीः डॉ. योगेश क्षीरसागर

## योगेशभैय्या सुख-दु:खात धाऊन जाणारे व्यक्तिमत्व-जनार्धन तुपे

डॉ.योगेश क्षीरसागर हे सामान्य माणसाच्या सुखा दुःखात धाऊन जाणारे व्यक्तिमत्त्व असल्याचे सांगितले. हे नेतृत्व विधानसभेत गेलेच पाहिजे. संदीप क्षीरसागर यांनी मागील पाच वर्षात कसलेच कामे केली नसल्यामुळे कसलेही पद नसताना बीड मतदारसंघाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणत निधी उपलब्ध करून विकास कमी करणाऱ्या डॉ.योगेश क्षीरसागरांचा विजय आजच निश्चित झाला असल्याचे सांगितले.

## दिवसरात्र एक करू पण योगेश भैय्यांना आमदाराच करू-बप्पासाहेब घुगे

निवडणुकीच्या उमेदवारीसाठी अनेक जण प्रयत्न करत असताना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तिकीट खेचून आणले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांची साथ असल्याचे सांगितले. डॉ.योगेश क्षीरसागर यांचे कुठल्याच व्यक्तीशी वैर नसून सर्वांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना आमदार बनवायचे असल्याचे सांगितले. दिवसरात्र एक करू पण डॉ.योगेशभैय्यांना आमदराच करू असे सांगितले.

## आमदारांनी काय दिवे लावले? -भाऊसाहेब डावकर

भाऊसाहेब डावकर यांनी आ.संदीप क्षीरसागर यांच्यावर जोरदार टीका करत त्यांनी मागील पाच वर्षात काय दिवे लावले हे सांगितले. तसेच डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांची जाण असणारे, हाकेला ओ देणारे नेतृत्व मिळाल्याचे सांगितले. काकूंचा वासा खऱ्या अर्थाने डॉ.योगेश हेच चालवू शकतात. मागील पाच वर्षाची सल डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या भरून निघणार असल्याचे देखील त्यांनी उपस्थित नागरिकांना सांगितले.

**बीड (प्रतिनिधी)** दि.५ : बीड विधानसभा मतदारसंघ विकासाच्या वाटेवर आणण्यासाठी मला संधी द्यावी. मतदारसंघात टक्केवारी घेणाऱ्या आमदारामुळे विकासकामे रखडली असल्याचा गंभीर आरोप महायुतीचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी केला आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचाराचा शुभारंभ नाळवंडी जि.प. गटातून करण्यात आला असून ढेकणमोहा येथे मंगळवारी (दि.५) सभा झाली. यावेळी ते उपस्थितांना संबोधित करत होते. व्यासपीठावर माजी आमदार जनार्धन तुपे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, अरुण लांडे, सुधीर काकडे, नंदकुमार कुटे, संदीप डावकर, स्वरूप राठोड, बंडा राठोड, अच्युतराव शेळके, भिकू शिंदे, भारत कानडे, बाबासाहेब राठोड, तेजाब चव्हाण, शुभम कातांगळे, विनोद हातागळे, विद्याभूषण बेदरकर, शुभम कुलथे, मिलिंद ठोकळ, अभिमान गुंदेकर, दत्तप्रसाद सानप, रामहरी कुटे, अशोक वैद्य, अंबादास पवार, इम्रान पटेल, रघुनाथ पवार, अनिल जाधव, भगवान देवकते, बाबासाहेब काशिद, नागेश शिंदे, प्रभाकर ठिमरे, विष्णू पवार, हनुमंत बांडे, गणेश पवार, तुकाराम जाधव, दीपक सुरवसे, अनिल लोकरे आदींची उपस्थिती होती. डॉ.योगेश क्षीरसागर म्हणले, आजची सभा ही एक नवीन पर्वाची सुरुवात असून पुढील अनेक वर्ष दिशा देणारी आहे. येणाऱ्या काळात बीड

## डॉ.योगेशभैय्याच्या विजयाचा गुलाल उधळू - सुधीर काकडे

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचाराची सुरुवात ही गोरक्षनाथांच्या पायथ्याशी झाल्याने त्यांचा विजय कोणीच रोखू शकत नसल्याचे सांगितले. संदीप क्षीरसागर हे विरोधी उमेदवारच नाहीत. कारण त्यांच्यामुळे बीड मतदार संघाचा विकास थांबला असल्याचे सागितले. मागच्या निवडणुकीत जी चूक केली ती यावेळी करू नका सर्वांनी सतर्क राहून काम करा विजय नक्की होणार म्हणून गाफील राहू नका, येणाऱ्या २३ तारखेला डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या विजयाचा गुलाल उधळू असे सुधीर काकडे यांनी जाहीर सभेत बोलताना सांगितले

शहरासह ग्रामीण भागाचा विकास करायचा आहे. मागील एक वर्षात मतदारसंघात केलेली कामे यामुळे उमेदवारी मिळेल, याची खात्री होती. शहराच्या प्रत्येक वार्डात, गावगावात जाऊन लोकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे त्याचे प्रश्न मार्गी लावले. माजी मंत्री जयदत्तआण्णांनी उमेदवारी मागे घेऊन एकप्रकारे आशीर्वाद दिलाय. त्यांच्या निर्णयामुळे पक्षाला मोठी ताकद मिळेल. सर्व कार्यकर्ते आता जोमाने कामाला लागले आहेत. टक्केवारी घेणाऱ्या आमदारामुळे बीड मतदारसंघाची कामे रखडली. आमदाराने टक्केवारीसाठी कामे



अडविली. त्यामुळे अनेक विकासकामे पूर्ण झाली नाहीत. आता ही कामे पूर्ण करण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. बीड मतदारसंघातील कोरडा दुष्काळ दूर करायचा आहे. सिंचनाचा प्रश्न सोडवायचा आहे. युवकांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून द्यायचा आहे. चांगले बीड, संपन्न बीड घडवायचे आहे. विरोधकांकडे कसलेच विकासाचे मुद्देच नाहीत, त्यांच्याकडून फक्त जातीपातीचे आणि धर्माचे मुद्दे मांडले जात आहेत, असाही आरोप त्यांनी केला. यावेळी पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ६ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# गॉड सेव्ह दी क्वीन Vs वन्दे मातरम

(7 नोव्हेंबर- वन्दे मातरम् जन्मदिन विशेष.)

वन्दे मातरम् या गीताच्या पहिल्या कडव्याला भारतीय संविधानानुसार 'राष्ट्रीय गीत' म्हणून दर्जा प्राप्त झाला आहे. हे गीत कविश्रेष्ठ बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी रचले आहे. इ.स.१८८२मध्ये प्रकाशित केलेल्या त्यांच्या आनंदमठ या कादंबरीमध्ये हे गीत लिहिले आणि तेच भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी प्रेरणागीत बनले. या गीताला कविवर्य गुरूदेव रवींद्रनाथजी टागोर यांनी संगीत दिले आहे. नागरिकांच्या मनमंदिरात भारत देशाविषयी भक्ती, प्रेम आणि अभिमान जागविणारा श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींचा हा वैशिष्ट्यपूर्ण शैलीतील लेख वाचकांच्या सेवेत... संपादक.

"वन्दे मातरम्, सुजलां सुफलाम्!
मलयजशीतलाम्,
शस्यश्यामलाम् मातरम्।"

कोलकाता विश्वविद्यालयाच्या स्थापनेनंतर सुरुवातीच्या काळात बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी या विद्यापीठातून बीएची पदवी प्राप्त केली. इंग्रज सरकारने त्यांची नियुक्ती कलकत्त्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट म्हणून केली. नंतर ते कलकत्त्याचेच डिस्ट्रिक्ट कलेक्टर झाले. ते प्रखर देशभक्त होते. त्यांना मागील शतकातील संन्याशांचे बंड आणि १८५७चे स्वातंत्र्ययुद्ध यांचे फार आकर्षण होते. त्याच साली इंग्रज सरकारने 'गॉड सेव्ह दी क्वीन' हे ब्रिटिशांचे राष्ट्रगीत भारतात रुजू करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे ते राष्ट्रगीत भारताचेही राष्ट्रगीत आहे, अशी वातावरण निर्मिती करण्याकरिता कार्यक्रमात, सैन्यात आणि शाळांमध्ये त्यांनी ते गीत रुजवण्याचा प्रयत्न केला होता. यामुळे बंकिमचंद्र खुप संतप्त झाले. सन् १८७६चा तो काळ होता. भारतीय लोक या ब्रिटिश राष्ट्रगीताचा तिरस्कार करीत होते. बंकिमचंद्रांनी या विषयावर गहन विचार केला. त्यांच्या लक्षात आले, की गेल्या हजार वर्षांच्या गुलामगिरीमुळे भारत हा कधीच अखंड असा देश नव्हता आणि भारताचे कोणतेही राष्ट्रगीत नव्हते. म्हणून दि.७ नोव्हेंबर १८७६ रोजी त्यांनी देशभक्तीच्या भावनांनी ओथंबलेले, भारत देशाला मातृभूमी असे संबोधित करणारे आणि तिला नमन करणारे वन्दे मातरम् हे सहा कडव्यांचे गीत लिहिले. आपल्या मित्रांना हे गीत वाचून दाखवल्यावर ते म्हणाले की, हे भारतीयांचे खरे राष्ट्रगीत असले पाहिजे. त्यांनी मागील शतकातील संन्याशांचे बंड या ऐतिहासिक घटनेवर आधारित आनंदमठ ही कादंबरी इ.स. १८८२ साली लिहिली. त्यांनी या कादंबरीत वंदे मातरम् हे गीत समाविष्ट केले होते. या कादंबरीत देशभक्त संन्यासी लोक 'वन्दे मातरम्' हे गीत सामूहिकपणे गाताना दाखवले आहे.

"शुभ्रज्योत्स्ना पुलकितयामिनीम्!
फुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम्!
सुहासिनीं सुमधुर भाषिणीम्,
सुखदां वरदां मातरम्॥१॥"

भारताचा स्वातंत्र्य लढा १८५७च्या सशस्त्र क्रांतीपासून सुरू झाला. हा लढा यशस्वी झाला नसला, तरी याने पेटवलेली स्वातंत्र्याची मशाल पुढे अखंडितपणे निरनिराळ्या रूपांत प्रकट होत राहिली. बंगाल, महाराष्ट्र आणि पंजाब हे सशस्त्र क्रांतीचे केंद्र बनले. सुखदेव, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, चाफेकर बंधू, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासारख्या झपाटलेल्या क्रांतिवीरांनी इंग्रजांविरुद्ध ही क्रांतीची मशाल तेवत ठेवली. परंतु ही क्रांती वैयक्तिक पातळीवर किवा छोट्या समूहापर्यंत मर्यादित होती. सन १८७०च्या दशकात एका वेगळ्या आंदोलनाची पार्श्वभूमी तयार झाली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेच्या म्हणजे सन १८८५ पूर्वीचा तो काळ होता. इंग्रजांचे कुटिल कारस्थान आणि जुलमी राजवटीमुळे भारतीयांमध्ये स्वातंत्र्याची भावना जागृत होऊ लागली. अशा या वातावरणात 'वन्दे मातरम्' या गीताचा जन्म झाला.

"कोटि कोटि-कण्ठ कल-कल निनाद कराले!
कोटि-कोटि भुजैर्धृत-खर करवाले!
अबला केन मा एत बले!
बहुबलधारिणीं नमामि तारिणीं!
रिपुदलवारिणीं मातरम्॥२॥"

चॅटर्जींच्या आनंदमठ या कादंबरीला अभूतपूर्व यश मिळाले व ही कादंबरी खूप लोकप्रिय झाली. त्यामुळे वन्दे मातरम् हे देशभक्तीचे अप्रतिम गीत लोकांपर्यंत पोहोचले आणि या गीताला खूप लोकप्रियता सुद्धा मिळाली. इ.स.१८९६ साली काँग्रेसच्या कोलकाता येथील राष्ट्रीय अधिवेशनात गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांनी हे गीत गाऊन संपूर्ण अधिवेशन राष्ट्रभक्तीच्या भावनेने भारावून टाकले होते. पुढे १९०१मध्ये पुन्हा काँग्रेसचे अधिवेशन तेथेच झाले असताना या अधिवेशनात श्री दखिना चरण सेन यांनी या गीताचा सामूहिक अभ्यास करून घेतला. चार वर्षांनी इंग्रज सरकारने या गीतावर बंदी आणली. तरीसुद्धा बनारस येथील काँग्रेस अधिवेशनात गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुतणी श्रीमती सरलादेवी यांनी हे गीत गायले. त्याच साली इंग्रजांनी बंगालचे विभाजन केले. ही घटना 'वंग-भंग चळवळ' या नावाने इतिहासात नमूद आहे. वंग-भंगच्या विरोधात झालेल्या प्रचंड आंदोलनात वंदे मातरम् हे गीत प्रेरणादायी ठरले. त्यावेळी हिदू-मुस्लिम सर्वांनी त्याचे गायन केले. सर्वांनी एकजुटीने केलेल्या या उग्र आंदोलनामुळे इंग्रज सरकार हादरले आणि त्यांना बंगालची फाळणी रद्द करावी लागली.

"तुमि विद्या, तुमि धर्म! तुमि हृदि, तुमि मर्म! त्वम् हि प्राणा: शरीरे!
बाहुते तुमि मा शक्ति!
हृदये तुमि मा भक्ति! तोमारई प्रतिमा गडी मन्दिरे-मन्दिरे॥३॥"

वन्दे मातरम् हा भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा बीजमंत्र होता. लाला लजपतराय यांनी त्या काळात लाहोरहून एक पाक्षिक काढले, त्याचे नाव होते 'वन्दे मातरम्!' हिरालाल जैन यांनी सन १९०५मध्ये भारतातील पहिला राजकीय चित्रपट बनवला व त्याचा शेवट वंदे मातरम् या गीताने केला. इ.स.१९१५पासून काँग्रेसच्या प्रत्येक राष्ट्रीय अधिवेशनात नियमितपणे आग्रहपूर्वक वन्दे मातरमचे गायन होऊ लागले. त्यावेळी ते इस्लामविरोधी नव्हते की जातीयही नव्हते. हिदू-मुस्लिम सर्वजण सारखेच वंदे मातरम्चा जयघोष करीत होते. अनेक क्रांतिकारक इंग्रजांचे अत्याचार सहन करत व वन्दे मातरमचा जयघोष करत फासावर गेले. स्वातंत्र्य आंदोलनात हा अतिशय लोकप्रिय असा जयघोष होता. कोणत्याही मोर्चामध्ये 'भारत माता की जय' आणि 'वन्दे मातरम्' हे जयघोष असायचे. सन १९२१मध्ये काँग्रेसने खिलाफत आंदोलनाला पाठिंबा दिल्यानंतर मुस्लिम समाजातील धर्मांध व कट्टरतावादी लोकांचे महत्त्व वाढले. याबरोबरच वन्दे मातरम्ला इस्लामविरोधी आणि जातीय ठरवून त्याचा विरोध सुरू झाला. सन १९२३मध्ये काकीनाडा येथे झालेल्या काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात तत्कालीन अध्यक्ष महंमद अली यांनी या गीतात मूर्तिपूजा असल्यामुळे याला इस्लामविरोधी घोषित केले.

# निर्भय, पारदर्शक, नि:ष्पक्ष वातावरणात निवडणूक प्रक्रिया पार पाडा - निवडणूक निरीक्षक मल्लिका सुरेश

बीड दि. 04 : बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात निर्भय, पारदर्शक आणि नि:ष्पक्ष वातावरणात निवडणूक प्रक्रिया पार पाडावी, अशा सूचना निवडणूक निरीक्षक (पोलिस) मल्लिका सुरेश (भा. पो.से) यांनी जिल्ह्यातील सर्व पोलिस अधिकाऱ्यांसह, निवडणूक प्रक्रियेतील सर्व नोडल अधिकारी यांना आज दिल्या. यावेळी गेवराई, माजलगावच्या निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) लालटनपुई वाँगचाँग, केज-परळीचे निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) सुनील अंचिपका यांचीही उपस्थिती होती.

बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील पोलिस विभागाचे वरिष्ठ अधिकारी, नोडल अधिकारी यांच्या उपस्थितीत कायदा व सुव्यवस्था याबाबत आढावा बैठक निवडणूक निरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, प्र. अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी श्रीमती अर्पिता ठुबे (भा.प्र.से), बीडचे अपर पोलिस जिल्हा अधीक्षक बीड सचिन पांडकर, अंबाजोगाईचे अपर पोलिस जिल्हा अधीक्षक चेतना तिडके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.ज्ञानोबा मोकाटे, चंद्रशेखर केकाण, जिल्हा उपनिबंधक समृत जाधव, यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पोलिस स्टेशनचे प्रभारी, आदींसह सर्व विभागाचे नोडल अधिकारी, पोलिस विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. पाठक यांनी जिल्ह्याची भौगोलिक स्थिती, जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आलेल्या एकूण तयारीबाबत सविस्तर माहिती निवडणूक निरीक्षक यांना सादर केली. तर जिल्हा पोलिस अधीक्षक श्री. बारगळ यांनी जिल्ह्यातील मतदारसंघ निहाय मतदान केंद्रे, मतदान केंद्रावरील पोलिस बंदोबस्त, उपलब्ध मनुष्यबळ, निवडणूक प्रक्रियेअंतर्गत करावयाची प्रतिबंधात्मक कार्यवाही, अंमलबजावणी आदींसह जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत सविस्तर माहिती निवडणूक निरीक्षक यांना दिली. जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आलेल्या सर्व कार्यवाहीची प्र. अपर जिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनीही माहिती दिली. पोलिस विभागाकडून करण्यात आलेल्या व करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निवडणूक निरीक्षक यांना सविस्तर माहिती दिली.

******

# आ. महेश लांडगे म्हणजे विधायक कामाचे बादशहा - सुरेश म्हेत्रे यांचे प्रतिपादन

पिंपरी, पुणे (दि. ५ नोव्हेंबर २०२४) भोसरी विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार महेशदादा लांडगे म्हणजे विधायक कामाचे बादशहा आहेत. जी कामे वर्षानुवर्ष प्रलंबित होती ती कामे त्यांनी मार्गी लावली असे प्रतिपादन माजी नगरसेवक व पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे माजी अध्यक्ष सुरेश म्हेत्रे यांनी माध्यमांशी बोलताना केले.

सुरेश म्हेत्रे म्हणाले की, राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना अनधिकृत बांधकामांना शास्ती कर लावण्यात आला. शास्ती कराचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित होता. तो आमदार महेश दादा लांडगे यांनी मार्गी लावला. मोशी येथे कचऱ्याचा डोंगर झाला होता. विद्युत प्रकल्प सारखे विविध प्रकल्प राबवून तिथल्या लोकांचे जगणे सुकर केले. दुर्गंधीही कमी झाली. तरुण पिढीमध्ये संत साहित्याची आवड निर्माण व्हावी यासाठी संत पिठाची स्थापना केली. चिखली मध्ये संत तुकाराम महाराज नाट्यगृह उभारले. अनेक भागात डीपी रस्ते करून घेतले. त्यात चिखली ते देहू आळंदी रस्त्याला मिळणारा 24 मीटर रस्ता, देहू आळंदी रोड ते शुद्धीकरण प्रकल्पाकडे जाणारा 24 मीटर रस्ता, बग वस्तीकडे जाणारे दोन डीपी रोड अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

आमदार महेश लांडगे यांनी चिखली येथे गाव जत्रा मैदानासाठी जागा उपलब्ध करून दिली. तात्पुरत्या स्वरूपात बैलगाडा घाट, कुस्ती आखाडा झाला आहे. येत्या पाच वर्षात आणखी विकास होणार आहे. त्यामुळे चिखलीकर खुश आहेत असे सुरेश म्हेत्रे यांनी सांगितले.

या मतदारसंघात चिखली ते तळवडे ,मोरे वस्ती, म्हेत्रे वस्ती, ताम्हाणे वस्ती, सोनवणे वस्ती ज्योतिबा नगर, शेलार वस्ती येथे अडीच हजार ते तीन हजार लघुउद्योग आहेत. प्रत्येकाची गुंतवणूक एक कोटीची आहे. अडीच हजार कोटीची गुंतवणूक झाली आहे. ५० हजार पेक्षा जास्त रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यावरचे कुटिर उद्योग लक्षात घेता लाखभर लोकांना रोजगार मिळाला आहे. तात्पुरते शेड उभारून लघु उद्योगाची संधी मिळाल्याने गुंतवणूक वाढली आहे. रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहे. मात्र वाढत्या नागरीकरणामुळे वाहतुकीची समस्या काही प्रमाणात आहे. त्यासाठी ही आमदार महेशदादा लांडगे यांनी पावले उचलली आहेत.

मतदार संघात काही भागात केबल जळतात विद्युत पुरवठा खंडित होतो अशा तक्रारी होत्या. सन २०१४ मध्ये आमदार महेश दादा लांडगे यांनी महापारेषण सोबत बैठक घेतली. त्या त्या भागानुसार केबल डिझाईन करून अंडरग्राउंड केले. मात्र नंतर लोकवस्ती वाढत गेली. तीन ते चार मजली घरे झाली. दोन किलो वॅटचा ताण दहा किलो वॅट वर गेला. त्यामुळे केबल टिकत नाही हे लक्षात घेऊन आमदार महेशदादा लांडगे यांनी वाढत्या लोकसंख्येची गरज लक्षात घेऊन ८०० कोटीचा निधी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती करून आणला. त्यातून आता केबल टाकण्यात येणार आहेत. ज्यादा क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर उभारण्यात येणार आहेत. विधानसभा निवडणूक संपल्यानंतर हे काम मार्गी लागेल. महापालिका एकदमच खोदाईला परवानगी देणार नाही. टप्प्याटप्प्याने हे काम करण्यात येणार आहे. औद्योगिक कंपन्यांबाबत बोलायचे झाले तर मशीन अनेक असतात .त्यामुळे केबल वर ताण येतो फ्युज जाणे, ट्रान्सफॉर्मर जळणे असे प्रकार घडतात. कोणाचे नुकसान होणार नाही अशा पद्धतीनेच आमदार महेशदादा लांडगे आजवर मार्ग काढत आले आहेत. विजेचा प्रश्न सोडविण्यासाठीही त्यांनी अशीच पावले टाकली आहेत असे म्हेत्रे यांनी सांगितले.

नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड नियोजित पुलाला आमदार महेश दादा लांडगे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून मंजुरी आणली आहे. एकूणच महेशदादा लांडगे हे विधायक कामाचे बादशहा आहेत.

# निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडुन लेख्यांच्या तपासणीसाठी तारखा निश्चित

बीड, दि, ४ : भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार उमेदवाराच्या खर्चाची नोंदवही तपासणीसाठी तीन तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. उमेदवारांच्या खर्च नोंदवहीच्या तपासणीसाठी दिनांक, वेळ व स्थळ निश्चित करण्यात आल्याचे बीड जिल्ह्यातील सहाही मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे.




२२८-गेवराई विधानसभा मतदारसंघातील उमेदवाराच्या खर्च नोंदवहीच्या लेख्यांची तपासणी करण्यासाठी ०७ नोव्हेंबर, १२ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ या तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. सदरील तपासणी गेवराई येथील तहसील कार्यालयाच्या गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या खर्च संनियंत्रण कक्ष येथे सकाळी नऊ ते दुपारी एक या कालावधीत होईल. २३३-परळी विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवाराच्या खर्च नोंदवहीच्या लेख्यांचीही तपासणी ०७ नोव्हेंबर, १२ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ याच तारखांना सकाळी अकरा वाजता परळी तहसील कार्यालयातील खर्च संनियंत्रण कक्षात होईल.

तसेच २३०-बीड विधानसभा मतदारसंघात बीड उमेदवाराच्या खर्च नोंदवहीच्या लेख्याची तपासणीही ०७ नोव्हेंबर, १२ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ रोजी बीड येथील तहसील कार्यालयातील खर्च संनियंत्रण कक्षात दुपारी दोन ते पाच यावेळेत होणार आहे. तर २३२-केज विधानसभा मतदारसंघातील उमेदवाराच्या खर्च नोंदवहीच्या लेख्याची तपासणीही ०७ नोव्हेंबर, १२ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ रोजी केजच्या शासकीय विश्रामगृह येथे दुपारी तीन वाजता होणार आहे. २२९- माजलगाव विधानसभा मतदारसंघातील उमेदवाराच्या खर्च नोंदवहीच्या लेख्यांची तपासणी ०८ नोव्हेंबर, १३ नोव्हेंबर आणि १८ नोव्हेंबर रोजी माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या उपविभागीय अधिकारी कार्यालय, माजलगाव येथील खर्च संनियंत्रण कक्षात सकाळी १० ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत होईल. तर २३१ आष्टी विधानसभा मतदारसंघातील उमेदवाराच्या खर्च नोंदवहीच्या लेख्यांची तपासणी करण्यासाठी ०८ नोव्हेंबर, १३ नोव्हेंबर आणि १८ नोव्हेंबर या तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. ही तपासणी आष्टीतील उपकोषागार कार्यालयातील खर्च संनियंत्रण कक्ष येथे सकाळी १० ते सायंकाळी पाच या वेळेत होईल.

# गुजरात आमचा भाऊ, :तर आम्हाला आनंदच; शेवटी शरद पवार मनातलं बोललेच!

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असून, सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. पुन्हा एकदा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ते बारामतीमध्ये आयोजित व्यापारी मेळाव्यात बोलत होते. जीएसटीच्या मुद्द्यावरून त्यांनी अजित पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. नेमकं काय म्हणाले शरद पवार?

जीएसटी इशु हा अत्यंत महत्वाचा आहे. जीएसटी कॉन्सिल ही संस्था वेगळी संस्था आहे. प्रत्येक राज्याचा अर्थमंत्री हा कंपल्सरी त्याचा सभासद आहे. त्याच्या गैरहजेरीमध्ये अर्थ खात्याचे सचिव गेले वरिष्ठ अधिकारी गेले, त्यांना तिथे मत मांडण्याचा अधिकार नाही. दुर्दैवाने महाराष्ट्राचे अर्थमंत्री त्या बैठकीला सतत गैरहजर राहिले. त्यामुळे महाराष्ट्राची भूमिका त्या ठिकाणी मांडली गेली नाही असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. जेव्हा अर्थमंत्र्यांपेक्षा वरिष्ठ मंत्र्यांकडे आम्ही जीएसटीचा प्रश्न उपस्थित केला, तेव्हा त्यांनी आम्हाला स्पष्ट सांगितलं तुमचे लोक हजर राहत नाहीत. महिना पंधरा दिवसांनी वेगळे चित्र दिसले तर हा जीएसटीचा प्रश्न आम्ही अधिक गांभीर्यानं घेऊ असंही त्यांनी यावेळी म्हटलं. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. टाटांना नागपूरला जागा दिली, सरकार बदललं टाटा म्हणाले मी नागरपूरला कारखाना काढू शकत नाही. मोदी साहेबांचं पंतप्रधान पद हे आमचा कारखाना हलवायला उपयोगी पडलं. वेदांता पॉक्स कॉन ही कंपनी दिल्लीतून हुकूम आला आणि गुजरातला गेली. गुजरात हा आमचा भाऊ आहे, आमचं म्हणणं एवढंच आहे की तुम्ही आमच्या ताटातील घेऊ नका, तुम्ही तुमच्या ताटात तयार केलं तर त्याचा आम्हाला आनंदच आहे, असा टोला यावेळी शरद पवार यांनी लगावला आहे.

दरम्यान मी फक्त दहा जागा लढवल्या, त्यातील आठ ठिकाणी आम्हाला विजय मिळाला. पाच वर्षांपूर्वी आमची चार लोक निवडून आले होते आणि काँग्रेसचा एक. नवीन खासदारांची बैठक मी घेत असतो, त्यांना मार्गदर्शन करत असतो. त्याचा फायदा महाराष्ट्राची भूमिका लोकसभेमध्ये मांडण्यासाठी त्यांना होतो, असंही यावेळी शरद पवार यांनी म्हटलं आहे.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता
दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ६ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com


# लबाड क्षीरसागरांपासून बीडकरांची सुटका करण्यासाठी अनिलदादा समर्थकांची वज्रमठ

## ही वेळ क्रांतीची, बीडवासियांचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी एकजुटीने कामाला लागा- अनिलदादा जगताप

बीड, प्रतिनिधी- गेल्या चाळीस वर्षांपासून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या लबाड क्षीरसागरांना धडा शिकवायचा असेल तर आता अठरा पगड जाती-धर्मातील माणसांची एकजूट होणे गरजेचे आहे. आलटून-पालटून क्षीरसागरांचे नवनवीन चेहरे समोर येतात, विकास पुरुष म्हणून स्वतःची ब्रँडिंग करतात आणि सामान्य जनतेला लुटत राहतात. सत्ता स्वतःच्या घरात टिकवून ठेवण्यासाठी क्षीरसागर आपापसात भांडण्याचे नाटकं करून बीडकरांची दिशाभूल करतात. मात्र लक्षात ठेवा हे सगळे क्षीरसागर एकच आहेत. आजवर जे झालं ते झालं पण आता ही वेळ क्रांतीची आणि परिवर्तनाची आहे. बीडवासियांचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी, बीड विकसाचा कायापालट करण्यासाठी एकजुटीने कामाला लागा. असे आवाहन बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांनी आपल्या समर्थक आणि कार्यकर्त्यांना केले. काल दि. 5 नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील समर्थक, मराठा सेवक तसेच सर्व जाती-धर्मातील अनिलदादांच्या समर्थकांनी मिळून बीड शहरातील जालना रोड वरील अनिलदादा जगताप मध्यवर्ती कार्यालय येथे विधानसभा पूर्व नियोजन तथा निश्चय बैठकीचे आयोजन केले होते. याप्रसंगी अनिलदादा जगताप यांनी उपस्थित राहून सर्वांशी मुक्त संवाद साधत पुढील दिशा, ध्येयधोरण यावर



सविस्तर चर्चा केली. बैठकीचे प्रास्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले तर गणेश मस्के, संदीपान बडगे, साहेबराव पोपळे, मधुकर शिंदे महाराज, मुकेश रसाळ, किशोर गिराम, प्रदीप माने, संतोष जाधव, सुनिल सुरवसे, महादेव रकटे, प्रकाश खांडे सर, पप्पूजी बरीदे या सर्वांनी मिळून अनिलदादांना विजयाचे समीकरण जुळवून आणण्यासाठी शहर-गावखेड्यात कोणत्या योजना/यंत्रणा राबविणे अत्यावश्यक आहे यांसदर्भात मार्गदर्शन सूचना केल्या तसेच अनिलदादा केवळ तुम्हीच आपल्या बीडवासियांना क्षीरसागरांच्या तावडीतून वाचवू शकता, आम्ही जीवाचं रान करू पण यंदा विजयाचा गुलाल तुमच्या कपाळी लावू आणि बीड क्षीरसागर मुक्त करण्यासाठी लढा देऊ असा ठाम निश्चय या बैठकीत सर्व जाती-धर्मातील बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्या समर्थकांनी केला. याप्रसंगी मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील समर्थक, मराठा सेवक तसेच सर्व जाती-धर्मातील माणसं उपस्थित होते.
०००००

---

# पीपल्स रिपब्लिकन पार्टी चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांच्या गाडीला कराड जवळ अपघात

कराड:- पीपल्स रिपब्लिकन पार्टी चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाड़े हे महायुती च्या प्रचार शुभारंभ सोहळाला उपस्थित राहण्यासाठी निघाले होते.मुंबईहुन कोल्हापुर च्या दिशेने काल रात्री निघाले होते. आज सकाळी ६ .३०च्या सुमारास कराड जवळ त्यांच्या चालकाला झोपे ची गूंगी आली आणि जयदीप कवाड़े यांच्या वाहनाला अपघात झाला. त्यांच्या सोबत असलेले त्यांचे सहकारी कपिल लिंगायत आणि मृणाल गोस्वामी यांनी त्यांना लगेच कराड येथील कृष्णा हॉस्पिटल एंड रिसर्च सेंटर येथे नेण्यात आले. जयदीप कवाड़े यांच्या डोक्याला व पायाला दाखापत झालेली आहे. डोक्याच्या उजव्या बाजूला स्तिचेस लागले असून आता त्यांच्या प्रकृति स्थिर आहे. त्यांना हॉस्पिटल मधून डिस्चार्ज करण्यात आले आहे, अशी माहिती प्रदेश उपाध्यक्ष मृणाल गोस्वामी यांनी एका प्रसिद्धि पत्रकात दिली




# निवडणूक कालावधीत सर्व वाहने तपासण्याचे आदेश - राज्य मुख्य निवडणूक अधिकारी एस चोकलिंगम

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते खासदार शरद पवार बारामतीमध्ये दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने बोलताना त्यांनी सत्ताधारी पक्षाच्या उम ेदवारांना सरकारी तसेच पोलिसी वाहनातून रसद पुरवली जाते. असा खळबळजनक आरोप राज्यातील महायुती सरकारवर केला. या संदर्भात राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोकलिंगम यांच्यावर प्रश्नांचा भडीमार करता त्यांनी सांगितले की, त्यांच्या आरोपानंतर राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सर्व वाहने तपासण्याचे आदेश दिले आहेत असे त्यांनी स्पष्ट केले. विधानसभा निवडणूकीच्या रिंगणातून उमेदवारी अर्ज म ागे घेण्याचा शेवटची मुदत संपल्यानंतर चोखलिंगम यांनी आज मंत्रालयातील वार्ताहर कक्षात पत्रकार परिषदेत माहिती दिली. नाशिक जिल्ह्यातील उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उमेदवारांपर्यंत एबी फॉर्म पोहोचविण्यासाठी शासकीय हेलिकॉप्टरचा वापर केला या बाबत विचारता चोकलिंगम म्हणाले की, संबधित जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल म ागविला असून अजित पवार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या खर्चात तो खर्च दाखविण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. माध्यम ावरून आलेल्या माहितीची दखल घेण्यात आली आहे. विमान असताना हेलीकॉप्टर दाखविण्यात आले आहे. या संबधीचा अहवाल प्राप्त होताच कारवाई करण्यात येणार असेही त्यांनी सांगितले.

---

# दिव्यात उभारली भव्यदिव्य सिंधुदुर्ग किल्ल्याची प्रतिकृती.

संतोष पडवळ – प्रतिनिधी ठाणे, दिवा ता ५ नोव्हे : महालक्ष्मी कोकण वॉरियर्स व वीर हनुमान मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने निलेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवरायांच्या मावळ्यांनी तीसाई नगर, दातिवली येथे दीपावली निमित्त सिंधुदुर्ग जिल्ह्यातील स्वराज्याची शिवलंका म्हणून ओळख असलेला छत्रपती शिवरायांचा एकमेव असा जलदुर्ग म्हणून प्रसिद्ध अश्या सिंधुदुर्ग किल्लयाची भव्य दिव्य अशी प्रतिकृती उभारली आहे. सदर मंडळाने प्रत्येक वर्षी असा उपक्रम हाती घेऊन अनेक पारितोषिके पटकावली आहेत. दिव्यातील शेकडो नागरिक , महीला वर्ग किल्ला पाहण्यासाठी येत आहेत असे यावेळी मंडळाचे आधारस्तंभ निलेश म्हात्रे यांनी यावेळी बोलताना सांगितले आहे. तसेच किल्याची प्रतिकृती उभारण्यासाठी वीर हनुमान मित्र मंडळ (दिवा – दातिवली ) ठाणे महालक्ष्मी कोकण वॉरियर्सचे संकेत उमासरे, तन्मय सावंत, ओमकार भायजे, सुजल केदारी, पवन केदारी, संदीप गुरव नरेश भुरवणे, विश्वनाथ नारकर, वैभव उमासरे, परेश हरेकर, सचिन गोताड , गौरव भोसले चेतन पवार, अजित मेस्त्री, नवनीत सावंत , आदित्य जाधव, शुभम डीके, दीपक पाताडे, स्वयमब गुरव, राज पवार, अथर्व भायजे या पदाधिकारी यांनी दिवस रात्र अथक परिश्रम घेतले. सिंधुदुर्ग किल्ला हा भारत देशाच्या पश्चिम किनारपट्टीवर महाराष्ट्राच्या कोकण प्रदेशात असलेला एक समृद्ध किल्ला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात सिंधुदुर्ग जिल्ह्यात अरबी समुदात सिंधुदुर्ग हा जलदुर्ग किल्ला बांधला. १६६४ साली शिवरायांनी बांधलेला हा किल्ला प्रभावीपणे काळाच्या कसोटीवर आज देखील भक्कमपणे उभा आहे. तसेच अनन्यसाधारण ऐतिहासिक महत्व असणारा हा सिंधुदुर्ग किल्ला परकीय आक्रमणापासून बचाव करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीतून प्रख्यात वास्तुविशारद हिरोजी इंदुलकर यांनी सिंधुदुर्ग किल्लयाची रचना करून हा भव्य सागरी किल्ला उभारला. आजतागायत येथे महाराजांच्या पाऊल खुणा देखील आहेत अशी थोडक्यात माहिती मंडळाचे अध्यक्ष संकेत उमासरे यांनी दिली आहे.

# सोयगाव तालुक्यात एका गावात मतदानावर बहिष्कारासाठी एकमुखी ठराव

छत्रपती संभाजीनगर(चैताली औटे) सोयगाव तालुक्यातील शिंदोळ गावात मूलभूत सुविधा मिळत नसल्याने विधानसभा निवडणुकीत बहिष्कार करण्याचा एकमुखी ठराव संतप्त ग्रामस्थांनी मंगळवारी अख्ख्या गावाने ग्रामपंचायत मध्ये घेतला आहे त्यामुळे आता तालुका प्रशासनाची चिंता वाढली आहे.

सोयगाव-कन्नड विधानसभा मतदार संघात जोडणी केलेल्या शिंदोळ गावात गेल्या चाळीस वर्षांपासून परिवहन ची बस नाही गावांत शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पायी जाऊन शाळा गाठावी लागते तसेच गावाला जोडणी केलेल्या रस्त्याची गेल्या वीस वर्षांपासून चाळणी झाली आहे त्यामुळे ग्रामस्थांना जिल्ह्यावर व तालुक्यावर जाण्यासाठी अडचणी निर्माण होतात सोयगाव तालुक्यातील शिंदोळ गाव हे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या सीमेवर आहे. या गावापासून अवघ्या एक की मी अंतरावर जळगाव जिल्ह्यातील नगर देवळा प्राथमिक आरोग्य केंद्र आहे परंतु त्या आरोग्य केंद्रात केवळ सोयगाव तालुक्यातील असल्याने रुग्ण सेवा मिळत नाही या गावातील ग्रामस्थांना बनोटी आणि सोयगाव आरोग्य केंद्र चाळीस ते साठ की मी अंतरावर आहे त्यामुळे गंभीर रूग्णांना तातडीने उपचार मिळावे यासाठी नगर देवळा आरोग्य केंद्रात घेवून गेल्यावर त्या ठिकाणी प्रवेश बंदी करण्यात येते त्यामुळे येथील ग्रामस्थांना गावात कोणत्याही सुविधा मिळत नसल्याने ग्रामस्थांनी मतदान प्रक्रियेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय एकमुखी ग्रामसभेत घेऊन ठराव घेतला आहे. ठराव दुपारी दोन वाजता सोयगाव तहसील कार्यालयात दाखल करताच निवडणूक विभागात खळबळ उडाली आहे ठरावावर तब्बल एक हजार पन्नास नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहे.गावातील एक हजार तीनशे पंधरा मतदार असून हे मतदार विधानसभा निवडणुकीत मतदान करणार नसल्याचा आक्रमक पवित्रा घेतला असल्याचे जगदीश सोनवणे या ग्रामस्थाने सांगितले. गावात प्रचार बंदी पुढाऱ्याना गावबंदी दरम्यान विधानसभा निवडणुकीत गावात प्रचार करण्यासाठी आलेल्या विविध पक्षांच्या पुढाऱ्यांना व उमेदवारांना प्रचारासाठी गाव बंदी करण्याचाही निर्णय ग्रामस्थांनी घेतला असून गावात प्रचार साठी आलेल्या पुढारी व उमेदवारांना गावातून बाहेर काढण्यासाठी ग्रामस्थांनी रणनीती आखली आहे... प्रचाराच्या पहिल्याच दिवशी गावात शुकशुकाट दरम्यान शिंदोळ गावात मतदानावर बहिष्कार टाकण्याचा ठराव घेऊन पुढाऱ्यांना गाव बंदीचा निर्णय घेतल्याने प्रचाराच्या पहिल्या च दिवशी गावात शुकशुकाट आढळून आला होता.

---

# कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाचा दुसऱ्या आठवड्यात ही बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ

बीड (प्रतिनिधी) - शेतकरी कामगार पक्षाचे एकनिष्ठ नेते, माजी आमदार, माजी मंत्री दिवंगत गणपतराव देशमुख उर्फ आबासाहेब यांच्या जीवनावर आधारित कर्मयोगी आबासाहेब या मराठी चित्रपटाने लागोपाठ दुसऱ्या आठवड्यातील राज्यभर धुमाकूळ घातला आहे. चित्रपट रसिकांनी या चित्रपटाला भरभरून दाद दिली असून दिवसेंदिवस चित्रपटाला गर्दी वाढत आहे. जागतिक विक्रमी चित्रपट निर्माते अल्ताफ दादासाहेब शेख दिग्दर्शित “कर्मयोगी आबासाहेब” हा चित्रपट दुसऱ्या आठवड्यात ही बॉक्स ऑफिसवर धूम करत आहे. सिंघम अगेन, भुलभुलैया ३ यासारख्या चित्रपटांना टक्कर देत संपूर्ण भारतभरात गेल्या दहा दिवसात चित्रपटाने १०.२७ कोटींचा व्यवसाय केला आहे. अल्ताफ दादासाहेब शेख दिग्दर्शित आणि लिखित “कर्मयोगी आबासाहेब” या मराठी चित्रपटात आबासाहेबांच्या वारशाचा सन्मान, सशक्त संवाद आणि हृदयस्पर्शी कथन यांचा मिलाफ आहे. हा चित्रपट प्रदर्शनापूर्वीच अँम्सटरडॅम लिफ्ट-ऑफ आणि क्राऊनवूड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटाने “गिनीज बुक आणि हाई रेंज ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड” हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार ही प्राप्त केला आहे. या चित्रपटाची निर्मिती मायाक्का माऊली फिल्म प्रोडक्शन अँड मुंबई क्रिएशन इंटरनेट निर्माता बाळासाहेब महादेव एरंडे आणि मारुती तुळशीराम बनकर आहेत. दिवंगत भाई गणपतराव देशमुख यांच्या भूमिकेत अनिकेत विश्वासराव यांच्यासह हिंदी आणि मराठीतले २८ कलाकारांनी काम केले आहे. अवधूत गुप्ते यांनी संगीत दिले आहे. रिलायन्स एंटरटेनमेंट ने हा चित्रपट जगभर प्रदर्शित केला आहे. चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांचा २०१८ साली वेडा बी एफ हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. त्याही सिनेमाला अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले. त्या चित्रपटाने ही वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित केला. वेडा BF, बेतुका, कम ऑन विष्णू, ब्रेक डाऊन धारावी कट्टा असे एकाहून एक सरस चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन अल्ताफ दादासाहेब शेख यांनी केले आहे. आता कर्मयोगी आबासाहेब हा चित्रपट ही त्यांच्या दमदार लेखणीतून आणि दिग्दर्शनातून प्रेक्षकांच्या मनाला भावत आहे. प्रेक्षकांनी गेल्या दोन आठवड्यात चित्रपटाला भरभरून प्रतिसाद दिल्यामुळे आतापर्यंत चित्रपटाने १०.२७ कोटींचा व्यवसाय केला असून चित्रपटाची यशस्वी घोडदौड चालू आहे.



दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ६ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com


# तिकीट मिळालं नाही तेव्हा उद्धव ठाकरे रश्मी वहिनीचा फोन आला होता. - पूनम महाजन

मुंबई : भाजप आणि ठाकरे कुटुंबाचं संबंध किती कौटुंबिक आणि जिव्हाळ्याचे होते ते आज कसे आहेत. परंतू राजकारणात कधी काय घडेल हे सांगता येत नाही. एकमेकांचे शत्रू असलेले कधी कसे एकत्र येतील हे पण न समजणारे कोडं आहे. राजकीय शत्रूत्व असलं तरी कौटुंबिक मैत्री कशी असावी. अशा राजकीय मैत्रीचे विवेचन करणारी भाजपाचे दिवंगत नेते प्रमोद महाजन यांची कन्या पूनम महाजन यांची एका खाजगी वृत्तवाहिनीवरील मुलाखत आजचा भाजप नेत्यांना धडा शिकविणारी नक्कीच आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यातील मैत्री हे त्याचंच उदाहरण आहे. हीच मैत्री आणि भावबंध त्यांची पुढची पिढी अजूनही सांभाळत आहे.



याच महाजन आणि ठाकरे घराण्यातल्या अनोख्या नात्यावर प्रमोद महाजन यांची कन्या आणि भाजपाच्या नेत्या पूनम महाजन यांनी दिलखुलासपणे सांगितलं आहे. पूनम महाजन यांनी नुकतेच एका खाजगी चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी ठाकरे-महाजन कुटुंबातील नात्याविषयी सांगितलं. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाकडून तिकीट नाकारण्यात आलं, तेव्हा उद्धव ठाकरे यांना किती वाईट वाटलं होतं, याबाबतही त्यांनी खुलेपणाने सांगितले आहे. माझं ठाकरे परिवाराशी कौटुंबिक नातं आहे. भाजपा तसेच शिवसेना यांच्यात युती झाली होती तेव्हा ही युती अगोदर प्रमोद महाजन आणि बाळासाहेब ठाकरे आणि नंतर भाजपा आणि शिवसेना यांच्यात युती झाली असं म्हणायचे, असे पूनम महाजन म्हणाल्या तसेच, “प्रमोद महाजन रुग्णालयात होते, तेव्हा शेवटच्या दिवशी बाळासाहेब ठाकरे त्यांना भेटायला आयसीयूमध्ये आले होते. तेव्हा बाळासाहेब ठाकरे आजारी होते. प्रमोद तुम्ही बरे व्हा, असे बाळासाहेब म्हणाले होते. बाळासाहेब ठाकरे त्यावेळी खूप दु:खी झाले होते. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे यांच्या डोळ्यात पाणी होतं. आमचं हे कौटुंबिक नातं आहे. २०२४ साली मला भाजपाकडून तिकिट मिळवण्यात अडचणी येत होत्या, तेव्हा उद्धव ठाकरे यांनी प्रत्येक भाषणात, मुलाखतीत पूनमसोबत असं व्हायला नको असं म्हणायचे,” असंही महाजन यांनी सांगितलं.



ठाणे : राष्ट्रीय हिंदू स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अधिवक्ता बिपिन कुमार दुबे यांनी दिव्यातील अपना घर वृद्धाश्रमात साजरी केली दिवाळी. अपनाघर वृद्धाश्रमातील वृद्धाना दिवाळी फराळ व कपडे देण्यात आले. ( फोटो - संतोष पडवळ )

## लाडकी बहीण योजनेवरुन उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात जुंपली

विधानसभेसाठी प्रचार सुरु झालाय आणि सुरुवातीलाच लाडकी बहीण योजनेवरुन उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात जुंपली आहे. लाडकी बहिण योजनेमुळं कोणाचं घर चालतं का ?, महागाईचं काय असा सवाल करत देवा भाऊ, दाढी भाऊ आणि जॅकेट भाऊ अशी टीका केली. उद्धव ठाकरे यांनी राधानगरीच के पी पाटलांसाठी सभा घेतली. मुख्यमंत्री शिंदे यांनी शंभूराज देसाईंच्या पाटणमधून ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं. टप्प्यात सावज आल्यावर करेक्ट कार्यक्रम केला, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला. उद्धव ठाकरे म्हणाले की, ‘हे भाऊ नाहीत हे जाऊ तिथे खाऊ आहेत. या योजनेमुळे कोणाचे घर चालतंय असं एका जरी व्यक्तीने सांगितले तरी मी महाविकासआघाडीला सांगेल की महायुतीच्या विरोधात एकही उमेदवार नको. कारण घरं सगळी सुखी आहेत. ही योजना राबवताय पण महागाई कितीये.’ ‘माझी आई काटकसर करायची हे मी पाहिलेय. यामध्ये जर आम्ही थोडा हातभार लावायला गेला तर तुम्ही त्याला रेवड्या म्हणतात. त्याला लाच म्हणतात.



तुम्हाला लाज वाटली पाहिजेय ज्यांनी ज्यांनी यात खोडा घातलाय त्यांना कोल्हापुरी जोडा दाखवणार की नाही. असं एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. जेव्हा लोकांनी बाळासाहेबांचा विचार सोडले. पक्ष विकायला काढला. जेव्हा खच्चीकरण होऊ लागले. बाळासाहेबांचे धनुष्यबाण, विचार जेव्हा तोडून मोडून टाकले. वेळ साधून करेक्ट कार्यक्रम करायचा असतो. असंही शिंदे यांनी म्हटले आहे. भाजपच्या कटेंगे तो बटेंगे या कॅम्पेनवरुनही ठाकरेंनी ना तुटू देणार... ना लुटू देणार असा पलटवार केला. इकडे बारामतीच्या सभेतून शरद पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मोर्चा वळवला. पंतप्रधानांनी देशाचा विचार करायचा असतो. मुख्यमंत्र्यांनी राज्याचा विचार करायचा असतो. तुम्ही देशाचे पंतप्रधान आणि एकाच राज्याचा विचार करतात. मोदी फक्त गुजरातचाच विचार करतात, मग पंतप्रधान कशाला मुख्यमंत्रीच व्हा, असा चिमटा पवारांनी काढला. प्रचार जेमतेम सुरु झालाय. 20 तारखेला मतदान आहे. त्यामुळं जसजसा प्रचार शिगेला पोहोचले, टीकेचे रॉकेट फुटतील.

## महायुतीचा शिवडीत मोठा गेम, भाजपचा अधिकृतपणे राज ठाकरेंना पाठिंबा जाहीर,

मुंबईतील शिवडी विधानसभा मतदारसंघातून महायुतीकडून कोण निवडणूक लढवेल? याबाबतचा सस्पेन्स अखेर संपला आहे. कारण भाजप नेते आशिष शेलार यांनी आजच्या शिवडी येथील मेळाव्यात मनसेचे उमेदवार बाळा नांदगावकर यांना पाठिंबा जाहीर केला आहे. या मतदारसंघात ठाकरे गटाकडून अजय चौधरी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अजय चौधरी या मतदारसंघातून दोन वेळा जिंकून आले आहेत. असं असलं तरी आता अजय चौधरी यांना बाळा नांदगावकर यांचं कडवं आव्हान असणार आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत भाजप ठाकरे गटाच्या विरोधात आहे. त्यामुळे भाजपने या मतदारसंघात मोठा राजकीय गेम खेळला आहे. या मतदारसंघात उद्धव ठाकरेंचे उमेदवार अजय चौधरी यांच्या पराभवासाठी भाजपने राज ठाकरे यांचे उमेदवार बाळा नांदगावकर यांना पाठिंबा जाहीर केला आहे. हा पाठिंबा जाहीर करत असताना भाजपचा केवळ शिवडी या एकमेव मतदारसंघापुरता मनसेला पाठिंबा असेल, महाराष्ट्रात नसेल, असंदेखील आशिष शेलार यांनी यावेळी जाहीर केलं.



“मनसेला आमचा पाठिंबा हा महाराष्ट्रात नाही तर केवळ शिवडी मतदारसंघापुरता मर्यादीत आहे. आपण इथं खूप वेळापासून बसलेला आहात. पाणी देखील नाही. आपणही विरोधकांना इथं पाणी पाजल्याशिवाय शांत बसायचं नाही. आज शिवडीतील जनतेसमोर आपल्या भूमिकेबद्दल खुलासा झाला पाहिजे. शिवडी विधानसभेच्या जागेवर महायुतीचा उमेदवार द्यायचा होता. पण इथे आपला उमेदवार नाही. आपले मुंबईतील 36 पैकी 35 ठिकाणी उमेदवार आहेत. इथे उबाठा आणि मनसेचे उमेदवार आहेत.

# हिलींग हॅन्ड्स हॉस्पिटल चे प्रज्ञा दीदी, डॉ. देशपांडे, डॉ. वनवे यांच्या उपस्थितीत उद्घाटन संपन्न

शरद पवारांनी बारामतीत, अजित पवारांच्या विरोधात उघडपणे नेतृत्वावरुन आव्हान उभं केलं आहे. अजित दादांनी 25-30 वर्षे नेतृत्वं केलं. आता नवं नेतृत्वं म्हणून युगेंद्र पवारांना संधी द्या, असं आवाहन पवारांनी बारामतीकरांना दिलं. तसंच स्वत:च्या संसदीय राजकारणातून निवृत्तीचे संकेतही दिलेत. बारामतीत अजित पवारांचं नेतृत्वंच बदलण्याचं आवाहन शरद पवारांनी केलं. बारामतीत अजित दादांनी 25 ते 30 वर्षे कामं केली. पण आता पुढच्या 30 वर्षांची काम करणारं नेतृत्वं तयार करायचं आहे. त्यासाठीच युगेंद्र पवारांना उमेदवारी दिलीय, असं म्हणत शरद पवारांनी अजित पवारांच्या विरोधात युगेंद्र पवारांना विजयी करण्याचं आवाहन केलंय. अर्थात आता बारामतीतून अजित पवारांचं नेतृत्व बदला असं आवाहनच शरद पवारांनी केलं. बारामतीत अजित पवारांच्या विरुद्ध शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून अजित पवारांचेच पुतणे युगेंद्र पवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. आणि अजित पवारांसह शरद पवारांनीही बारामतीत जोरदार प्रचार सुरु केलाय. युगेंद्र पवारांचा अर्ज भरण्यापासून ते कन्हेरी गावातून प्रचाराची सुरुवातही शरद पवारांच्याच हस्ते झाली. काका पुतण्यामधील राजकीय सामना हा मिक्रिकीपर्यंतही पोहोचला. शरद पवारांनी भर सभेत अजित पवारांची नक्कलही केली.शरद पवारांनी मंगळवारी एकाच दिवसांत बारामती तालुक्यात 4 सभा घेतल्यात तर अजित पवारांनीही बारामती तालुक्यात गावांना प्रत्यक्ष भेटी दिल्यात. 1 आणि 3 नोव्हेंबरला गावांना भेटी देवून



छोटेखानी सभा घेत मत देण्याची विनंती अजित पवारांनी केली.बारामतीतूनच शरद पवारांनी संसदीय राजकारणातून निवृत्तीचे संकेतही दिले आहेत. राज्यसभेची खासदारकी संपण्यासाठी दीड वर्षांचा कालावधी आहे. त्यामुळं पुन्हा राज्यसभेवर जायचं की नाही, याचा विचार करावा लागेल असं पवार म्हणाले आहेत.लोकसभा निवडणुकीत पवार विरुद्ध पवार लढाईत अजित पवारांचा पराभव बारामतीकरच नाही तर महाराष्ट्रानं पाहिला. अजित पवारांच्या पत्नीला सुप्रिया सुळेंनी पराभूत केलं. आता विधानसभेत पुन्हा पवार विरुद्ध पवार लढाईत काका पुतण्याचाच सामना होतोय. युगेंद्र पवारांना जिंकवण्यासाठी शरद पवार मैदानात जोरात उतरलेत. अर्थात युगेंद्र अजित पवारांचा जसा पुतण्या आहे तसा शरद पवारांनाचा नातूही आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com